# जिल्हाधिकारी कार्यालय,जालना

प्रशासकीय इमारत, स.नं. ४८८, जालना

(जिल्हा नियंत्रणक कक्ष)/(आपत्ती व्यवस्थापन)

दुरध्वनी क्रमांक (02482)-223132 टोल फ्री क्रमांक 1077 फॅक्स क्रमांक (02482)-226477,225326

E-mail. rdcjalna@gmail.com, jalnaddmo@gmail.com Website: - www.jalna.gov.in, http://59.90.142.57/ddmajalna


जा.क्र.२०२०/मशाका/जिनिक/आव्यप्र/कावि- दिनांक ३०/०४/२०२०

**(ई-मेलने/टपालाने)** आपत्ती प्राधान्य

वाचाः- १. साथरोग प्रतिबंध कायदा १९८७.

२. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.

३. या कार्यालयाचे समक्रमांकीत आदेश दिनांक २०.०४.२०२०, २१.०४.२०२० व पत्र दि.२२/०४/२०२०

४. या कार्यालयाचे समक्रमांकीत आदेश दिनांक २३/०४/२०२०.

५. आयुक्त कृषी, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र जा.क्र.आकृ-कक्ष/तां/नि.पुरवठा/१२३५६/२०२०/दि.२९/०४/२०२०.

## सुधारीत आदेश

ज्याअर्थी राज्य शासनाने करोना विषाणूचा (कोवीड-१९) प्रादूर्भाव रोखण्यासाठी राज्यात प्रतिबंधात्मक करणेसाठी राज्य शासनाने दिनांक १७.०४.२०२० अन्वये एकत्रित सुधारीत मार्गदर्शक तत्वे निर्ममित केली आहेत.

ज्याअर्थी, संदर्भ क्र.४ अन्वये जिल्ह्यातील नागरीकांची अत्यावश्यक वस्तूंच्या खरेदीसाठी गैरसोय होऊ नये या साठी विविध वस्तुच्या दुकांनाना/आस्थापनांना ठराविक वेळ निश्चित करून देण्यात आलेले आहे.

ज्याअर्थी माझे असे निदर्शनास आले आहे की, येणा-या खरीप हंगामसाठी शेतक-यांना वेळेत कृषी संबंधीत सेवा उपलब्ध होणे अत्यावश्यक आहे.

ज्याअर्थी, संदर्भ क्र.५ अन्वये आयुक्त कृषी यांनी जिल्ह्यात खते व बियाणे यांच्या वाटपाबाबत नियोजन करण्याबाबत सूचित केले आहे.

त्याअर्थी, मी **रविंद्र बिनवडे, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जालना** खालील प्रमाणे आदेशीत करीत आहे. संदर्भ क्र.४ वरील आदेशातील बाब क्र.१५ मध्ये नमुद खते व बियाणे यांच्या वेळेत खालील प्रमाणे अशंतः सुधारणा करण्यात येत आहे.

| अ.क्र. | बाब | वेळ |
|---|---|---|
| १५ | खते, बियाणे यांची दुकाने. | सकाळी ९ ते सांयकाळी ६ वाजेपर्यंत. |

संदर्भ क्र.४ च्या आदेशातील बाब क्र.१५ मध्ये नमुद खते व बियाणे यांच्या वेळेत वरील प्रमाणे वेळेची बदलाची नोंद घ्यावी.

उपरोक्त आदेशांचे पालन न करणा-या व्यक्ती, अधिकारी / कर्मचारी, संस्था अथवा समुह यांनी आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे कलम ५१ आणि भा.द.वि. १८६० चे कलम १८८ अन्वये शिक्षेस पात्र असलेला अपराध केला आहे असे समजण्यात येईल आणि पुढील दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

Raut

**(रविंद्र बिनवडे)** भा.प्र.से.

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जालना**

30/4/2020

**प्रत- (माहिती तथा कार्यवाहीस्तव)**

१. पोलीस अधीक्षक, जालना.

२. सर्व उपविभागीय अधिकारी (महसूल) जि.जालना.

३. सर्व तहसीलदार जि.जालना.

४. सर्व मुख्याधिकारी नगर परिषद / नगर पंचायत जि.जालना.

५. सर्व विभाग प्रमुख जि.जालना.

६. सर्व संबंधीतास.

७. जिल्हा माहिती अधिकारी, माहिती कार्यालय, जालना यांना प्रसिध्दीस्तव.